# केळे मजगांव घराणे

केळे हे गाव रत्नागिरीपासून ८ मैलांवर व मजगावपासून २ मैलांवर असून रत्नागिरी येथून मजगाव पर्यंतच एस्. टी. बस सेवा उपलब्ध आहे. मजगांव पासून पुढे पुलाचे पलिकडे २ मैल चालत जावे लागते. तेथे १२ वाड्यांपैकी केळे—आंबे कोडी येथे अभ्यंकरांची तीन घरे अस्तित्वात आहेत. परंतु त्यापैकी खालील दोन घरांतच अभ्यंकर कुटुंबाचे वास्तव्य असून तिसरे घर अभ्यंकरांची नात सहस्त्रबुध्दे यांचेकडे आहे.

१) श्री. गणेश दत्तात्रय अभ्यंकर व श्री. वासुदेव दत्तात्रय अभ्यंकर.

२) श्री. गजानन रामचंद्र अभ्यंकर व आई श्रीमती सीताबाई रामचंद्र अभ्यंकर. (श्री. गजानन रामचंद्र अभ्यंकर, त्यांची पत्नी व दोनही मुले मुकी आहेत.)

या गावची लोकसंख्या अंदाजे २५०० ते ३००० असून केळकर, सहस्त्रबुध्दे, बापट, गोखले, साठे, लिमये, बेहेरे इ. ब्राह्मणांची २०—२५ घरे आहेत. मराठी ७ वी पर्यंत प्राथमिक शाळा असून गावात नारळी, पोफळी, आंबा, फणस, काजू इ. ची लागवड व भातशेतीही आहे. लक्ष्मी नारायण, गणपती पंचायतन, काशी विश्वेश्वर, नवलाई, पावणाई, वाघजाई इ. ग्रामदेवतांची मंदिरे आहेत. नागूकाका अभ्यंकरांचे घराण्यात पूर्वी पाच पिढ्या अग्निहोत्र होते. परंतु हल्ली चालू दोन पिढ्यात ते चालू नाही. त्यांचेच मालकीच्या जमिनीतून स्वयंभू पाण्याचा झरा असून त्याचे पाणी बारमाही इतरांसही मिळते. केळे व मजगांव ही दोन गावें जोडगावे असल्यामुळे त्याला केळे—मजगांव असे संबोधतात.

केळे—मजगांव या गावी प्रथम वस्तीस आलेला पुरुष हा कुर्धे येथून इ. स. १७०० पूर्वी आला असावा असा पुरावा नारायण रावजी भानोशे आणि धोंडो गोविंद दाते—(पुरोहित) यांचे वहीतील उताऱ्यावरून आढळतो. या पुरोहितांच्या वहीतील जुन्या वंशावळीशी आपले मूळगांव केळे मजगांव आहे असे सांगणाऱ्या व्यक्तिंनी दिलेली माहिती पडताळून त्यांतील स्थलांतरानुसार त्यांच्या वंशावळी व त्यांतील व्यक्तिपरिचय पुढे दिला आहे. काहींची माहिती मिळाली नाही. त्यांचे पुढे तसे लिहिले आहे.

## घराणे क्रमांक १

## केळे मजगांव—मुंबई

१/१ **रघुनाथ**—ज्ञात मूळ पुरूष

२/२ **नारायण रघुनाथ** #

३/३ **रामचंद्र नारायण**— #

४/४ **नारू रामचंद्र**— उत्तम तालीमबाज होते. त्यांची पुण्यास गुरुजींची तालीम होती. ते मुलांना शिकवीत. त्यांची व दगडूशेट हलवाई यांची मैत्री होती. त्यामुळे ते त्यांना सल्ला देत असत. अविवाहित होते.


५/४ **चिंतामण रामचंद्र**— व्यवसाय—सावकारीचा. वास्तव्य—पुणे येथे डोलकर वाडीत (हुजूर पागे मागील रस्त्यावर) घर होते व केळे मजगांवहून काही उत्पन्न येत असे. पुणे जवळ कोथरूड येथे मळा व शेत जमीन होती. केळे—मजगांवहून जे काही उत्पन्न येत असे ते लक्ष्मी नारायणाचे देवालयासाठी खर्च करण्यास सांगितले. त्यामुळे ते बंद झाले व संबंधही तुटला.
भार्या : १) **लक्ष्मी**—माहेर—आपटे यांचे घराण्यातील. कै. दाजी गणेश आपटे, वकील यांची आत्या. २) नाव समजले नाही. माहेर—गाडगीळ घराण्यातील कन्या.

६/५ **गंगाधर चिंतामण**—प्लेगने मृत्यू.

७/५ **महादेव चिंतामण**—जन्म १८५४. मृत्यू १९३५. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—जी. आय. पी. रेल्वेत नोकरी होती.
भार्या : **जानकीबाई**—मृत्यू १९१६, सोलापूर. माहेर—दुर्गा केशव गोरे. पुणे.
कन्या :
१) **नर्मदा**—जन्म १९०६ वयाच्या ८१ व्या वर्षी मृत्यू. सासर—रिसबूड, मंडई जवळ, पुणे.
२) **येसू**—जन्म १९०९, वयाच्या ७९ व्या वर्षी मृत्यू. सासर—जोग, गुलबर्गा.

८/६ **श्रीराम महादेव**—लहानपणी मृत्यू.


## घराणे क्रमांक १
## केळे मजगांव–मुंबई




९/६ **विष्णू महादेव**–जन्म १८९३ मृत्यू १० ।२ ।१९३२. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–जी. आय. पी. रेल्वेत स्टेशनमास्तर होते. वास्तव्य–मनमाड. भार्या : **लक्ष्मीबाई**–जन्म १८९५ मृत्यू १९५७. माहेर–कृष्णाबाई महादेव नामजोशी.


कन्या :
१) **यमुना**–सासर–गोडसे, पुणे.
२) **विमल**–सासर–सुमती रामचंद्र जोशी, पुणे.
३) **सिंधु**–सासर–सिंधु अनंत जोशी, बेळगांव.
४) **इंदिरा**–सासर–इंदू छबुराव आगाशे, पुणे.

५) **रजनी**–सासर–सुलभा विनायक कडेकर, पुणे.
१०/७ **चिंतामण विष्णू**–जन्म २३ ।३ ।१९१४ पुणे. शिक्षण–इंटर आर्टस्. व्यवसाय–महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन मधून आर.टी.ओ. या पदावरून १९७१ मध्ये निवृत्त.
वास्तव्य–८२३ गोरेराम गल्ली, नाडकर वाडा, रविवार पेठ, नाशिक–१.
भार्या : **निर्मला**–माहेर–छबूताई गणेश करंदीकर.
कन्या :
१) **वंदना**–जन्म ११ ।२ ।१९५७. शिक्षण–एम्.ए.,बी.जे. सासर–मृणालिनी अत्रे. व्यवसाय–'गांवकरी' ची उपसंपादिका.
२) **रोहिणी**–जन्म ११ ।८ ।१९५९. शिक्षण–बी. ए., ए एम्. सासर–रोहिणी नंदकुमार गोखले. मुंबई.
३) **वसुधा**–जन्म २७ ।९ ।१९६१. शिक्षण–एम्.कॉम्. सासर–वसुधा कुलकर्णी. नाशिक.
११/८ **श्रीकांत चिंतामण (द. आ.)** – हा केशव सदाशिव जोशी, येवले यांचा पुत्र दत्तक आला.
व्यवसाय–वकील.
वास्तव्य–नाशिक.
कन्या : **सायली**–
१२/९ **अभिजीत श्रीकांत**–वय ११ वर्षे.
१३/७ **भास्कर विष्णू**–जन्म १९१४ मृत्यू १९७६, मॅन्चेस्टर येथे. शिक्षण–ए.एम्.आय. मेकॅनिकल व ए.एम्.आय. प्रॉडक्शन.
भार्या : **नलिनी**–जन्म १९२३. मृत्यू १९८२. शिक्षण–बी.ए. माहेर–कमल दत्तात्रय चितळे.
१४/८ **विष्णू भास्कर**–जन्म ३० ।९ ।१९४७. शिक्षण–बी.एस्सी. व्यवसाय–कल्याण येथे खाजगी कंपनीत प्रॉडक्शन मॅनेजर. वास्तव्य–बी/१९, राजहंस अपार्टमेंट, एस्.टी. वर्कशॉप मागे, ठाणे (प.)
भार्या : **लता**–शिक्षण–एम. ए. माहेर–लता वामन चितळे.
१५/९ **अजित विष्णू**–जन्म १९७१. शिक्षण–१२ वीत शिकत आहे.
१६/७ **श्रीपाद विष्णू**–जन्म १९२७, देवदिपावली दिवशी, निफाड येथे. शिक्षण–मॅट्रिक.
व्यवसाय–शिक्षक, नंतर समाजसेवा. वास्तव्य–मु. पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड.
भार्या : **मंगला**–व्यवसाय–प्राथमिक शिक्षिका.
माहेर–सिंधू कृष्णाजी पेंडसे.
कन्या :
१) **शकुंतला**–जन्म ४ ।१२ ।१९५६.
व्यवसाय–शिक्षिका. सासर–शकुंतला यशवंत जोशी. गुळसुंदे.
२) **दीपलक्ष्मी**–जन्म १३ ।६ ।१९५८. सासर–अनुराधा अशोक शिदोरे. कल्याण.
३) **शशिकला**–जन्म १५ ।७ ।१९६२. सासर–सुरूचि सुरेश शिदोरे. रोहा.
१७/८ **गणेशानंद श्रीपाद**–जन्म १३ ।६ ।१९५५.
वास्तव्य–वडगांव बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे.
१८/६ **यशवंत महादेव**– #
१९/६ **गणेश महादेव**–मृत्यू १९५३. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–मिलिटरीत सुभेदार मेजर होते. वास्तव्य–**पुणे.**
भार्या : **सरस्वती**–माहेर–देवधर. यवत., जि. पुणे.
कन्या : **उषा**–सासर–निर्मला रामचंद्र कर्वे. ४९२ शनिवार पेठ, पुणे–३०.
२०/७ **रामचंद्र गणेश**–व्यवसाय–नव महाराष्ट्र फिल्मस् डिस्ट्रीब्यूटर्स. वास्तव्य–अमरावती.
भार्या : **आशा**–माहेर–लेले. अपत्य नाही.
२१/७ **दत्तात्रय गणेश**–व्यवसाय -किर्लोस्कर कंपनीत नोकरी होती. वास्तव्य–**श्रीकृष्ण** सरस्वती, श्रीपाद सोसायटी, ४८१ क/८ पर्वती, पुणे–९.
कन्या : **रेखा**–
२२/८ **कुमार दत्तात्रय**–शिक्षण–एम्. कॉम्. व्यवसाय–टेल्को कंपनीत नोकरी. वास्तव्य–पुणे.
२३/८ **श्रीकांत दत्तात्रय**–शिकत आहे.
२४/७ **श्रीकृष्ण गणेश**–व्यवसाय–बँक ऑफ महाराष्ट्र मधे नोकरी. वास्तव्य–पुणे.
भार्या : **वैशाली**–माहेर–जोग. सासवड.
२५/८ **गिरिश श्रीकृष्ण**–शिकत आहे.
२६/८ **निखिल श्रीकृष्ण**–शिकत आहे.
२७/६ **शिवराम महादेव**–जन्म १८९६. मृत्यू १९१७. व्यवसाय–किराणा मालाचे दुकान. वास्तव्य–सोलापूर.
भार्या : **उमा**–माहेर–दामले.



श्री. नारायण महादेव

२८/६ **नारायण महादेव**–जन्म १५ ।५ ।१९०३. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–एल.आय.सी. मध्ये नोकरी. क्रिकेटची आवड तसेच धार्मिक व ऐतिहासिक वाचनाची आवड. वास्तव्य–२/६८ ईस्माईल बिल्डिंग, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०००१४.




कै. सौ. इंदिरा नारायण

भार्या : **इंदिरा**–जन्म २० ।६ ।१९२०. मृत्यू ९ ।३ ।१९९०. शिक्षण–मराठी ४ थी. माहेर–सखू आत्माराम परांजपे. बदलापूर, जि. ठाणे.
कन्या :
१) **सुधा**–जन्म ३० ।७ ।१९३९. सासर–वसुंधरा मधुसुदन भट. "दुर्वांकुर", एकदंत सोसायटी, फ्लॉट नं. ३ सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे–३७.
२) **मंदा**–जन्म २० ।१२ ।१९४५. सासर–मंदाकिनी सदाशिव वैद्य (गाडगीळ). दादर, मुंबई–२८.
२९/७ **विनायक नारायण**–जन्म २० ।१० ।१९४२. शिक्षण–बी. आर्क. व्यवसाय–आर्किटेक्ट (स्वतंत्र व्यवसाय). वास्तव्य–गौरी अपार्टमेंट, ब्लॉक नं. ए-१२ । कोपर रोड, कैलासनगर, डोंबिवली (प.).
भार्या : **मृणालिनी**–माहेर–नंदा दामोदर फाटक. बेळगांव.
३०/८ **शैलेश विनायक**–जन्म २० ।६ ।१९८०. शिक्षण–४थी शिकत आहे.
३१/७ **विद्याधर नारायण**–जन्म ३ ।७ ।१९५०. शिक्षण–इंटर पर्यंत, इंस्टुमेंट इंजिनियर. व्यवसाय–इंस्टुमेंट इंजि. बडोदे येथे स्वतःची फॅक्टरी व धंदा. वास्तव्य–सी/१–२, 'गुरूकृपा', पायल पार्क सोसायटी, गोल्डन सिल्वर अपार्टमेंट समोर, एलोरा पार्क जवळ, सुभानपुरा, बडोदे–७.
भार्या : **माधुरी**–माहेर–शुभदा विनायक खाडिलकर मूळगांव सांगली, राहणार डोंबिवली.
कन्या :
१) **गौरी**–जन्म २४ ।८ ।१९७८. शिकत आहे.
२) **चित्रा**–जन्म ३ ।५ ।१९८५. शिकत आहे.
३२/७ **अरविंद नारायण**–जन्म २४ ।२ ।१९५३. शिक्षण–इलेक्ट्रॉनिक चा डिप्लोमा. व्यवसाय–स्वतंत्र धंदा. वास्तव्य–२/६८ इस्माईल बिल्डिंग, दादर–मुंबई–१४.
भार्या : **मीनल**–माहेर–नीला माधव वैशंपायन. पिता–माधव वासुदेव वैशंपायन. वास्तव्य–३ मारिया बाग, झवेरिया रोड, मालाड (प.) मुंबई. मूळगांव कनकेश्वर, ता. अलिबाग.
३३/८ **अजय अरविंद**–जन्म १३ ।८ ।१९८१. शिक्षण–इयत्ता ३ रीत शिकत आहे.
३४/५ **वासुदेव चिंतामणी**– #

## घराणे क्रमांक २

### केळे मजगांव–अकोला–मुंबई




## घराणे क्रमांक २

### केळे मजगांव–अकोला–मुंबई

१/१ **लक्ष्मण–** #

२/२ **भास्कर लक्ष्मण**–व्यवसाय–शिक्षक, बाळापूर, जि. अकोला.

भार्या : नाव माहित नाही. माहेर–गोखले यांची कन्या.

३/३ **कृष्णराव भास्कर–**शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–सुपरिटेंडंट, कलेक्टर कचेरी, अकोला. (वऱ्हाड).

भार्या : **भीमाबाई–**मृत्यू २६ ।४ ।१९२६. माहेर–काळे.

४/४ **विनायक कृष्णराव–**जन्म १८९४, बुलढाणा. मृत्यू २० ।१० ।१९९८. शिक्षण–बी.ए. डेक्कन कॉलेज, पुणे, १९१३. एल्.एल्.बी. गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, मुंबई, १९१५–ह्या परिक्षेमध्ये पहिला नंबर, जज्ज स्पेन्सर प्राईझ व इनव्हेरारिटी हे १९१५ चे सुवर्णपदक प्राप्त. व्यवसाय–ई. ए. सी., अकोला.

भार्या : **सरस्वती–**माहेर–गंगूबाई सदाशिव सहस्त्रबुध्दे. नवगृही, धुळे. मृत्यू १९२३.


कन्या : **मयुरा (शांता) –**

५/५ **वासुदेव विनायक–**जन्म २७ ।९ ।१९१८, जठार पेठ, अकोला (वऱ्हाड). शिक्षण–बी.एस्सी., सी.ए.आय.आय.बी. व्यवसाय–ऑफीसर, रिझर्व बँक ऑफ इंडिया व सेक्रेटरी युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया. १९७१ साली नोकरी निमित्त दक्षिण अमेरिका, लंडनचा प्रवास. वास्तव्य–१९ मीना, प्लॉट नं. ३५३ ।५, आर.

बी. मेहता रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई. ४०००७७.
भार्या : **लीलावती**–माहेर–तारामती गोविंद कुंटे. सांगली. कन्या ३, पुत्र १
कन्या :
१) **शशिकला**–जन्म १८ ।१० ।१९४३. शिक्षण–बी. एस्सी., बी. लिब. प्रथम सासर–शशिकला सदानंद शहाणे. सदानंद विनायक शहाणे–मृत्यू १७ ।६ ।१९७५.
द्वितीय सासर–शशिकला यशवंत थिटे.
२) **शीला**–जन्म २१ ।१० ।१९४७. शिक्षण–१९६२, कर्नाटकच्या दहावीच्या परिक्षेत पहिली., १९६७, बी. एस्सी. (फर्स्ट क्लास), स. प. कॉलेज, पुणे. स्टॅटिस्टिक्स मध्ये पहिली., १९७० मधें एल्.एल्.बी. लॉ कॉलेज पुणे या परिक्षेत तुळपुळे सुवर्णपदक प्राप्त. सासर–शीला धोंडू दातार.
३) **अपर्णा**–जन्म ११ ।२ ।१९५०. मृत्यू ६ ।१० ।१९७५. शिक्षण–१९६३–कर्नाटकच्या दहावीच्या परिक्षेत दुसरी., एन्.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली तर्फे नॅशनल सायन्स टॅलेन्ट स्कॉलरशिप मिळाली., १९६८–बी.एस्सी. (स. प. कॉलेज, पुणे). सासर–अपर्णा विद्याधर थिटे.
६/६ **सुनिल वासुदेव**–जन्म ८ ।१२ ।१९६१. शिक्षण–१९७७–एन्.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली तर्फे नॅशनल टॅलेन्ट स्कॉलरशिप. १९८३–बी.टेक्. (आय.आय.टी., पवई), १९८५–एम्. टेक्. (आय.आय.टी., पवई). व्यवसाय–सिस्टिम एक्झिक्युटिव्ह, टाटा युनिसेस लिमिटेड एल्टोरो (यू.एस्.ए.)
भार्या : माहेर–सुलभा दत्तात्रय जोशी. एम्. एस्. डब्ल्यु. (बॉम्बे).
कन्या : **रेखा**
७/३ **रामचंद्र भास्कर**– #
भार्या : (१) माहेर–सहस्त्रबुध्दे. (२) माहेर–वैशंपायन.
कन्या : **आवडी**–सासर–केळकर.
८/४ **पुरुषोत्तम रामचंद्र**– #
९/४ **भास्कर रामचंद्र**– #
कन्या :
१) **मीरा**–सासर–सुचेता नारायण दास्ताने. वास्तव्य–४५२९ सरोजिनी नगर, न्यू दिल्ली- २३.
२) **तारा**–सासर–मृणालिनी व. गर्दे. वास्तव्य–सी २१ शिवाजी नगर, भोपाळ ४६२००१
३) **नीरा**–सासर–नीरा मधुकर परांजपे. वास्तव्य–२९ जयमंगल को. ऑ. हौ. सो. शिवशक्ती, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४.
१०/५ **रामचंद्र (दिलीप) भास्कर**–वास्तव्य–४२९३ साऊथ ५ १/२ स्ट्रीट, अपार्टमेंट १, टेरेर हट् इंडियाना ४७८०२ यू.एस्.ए. (अमेरिका)
११/४ **भालचंद्र रामचंद्र**– #
१२/४ **दत्तात्रय रामचंद्र**– #
कन्या : **जया**–
१३/५ **धनंजय दत्तात्रय**– #
१४/५ **संजू दत्तात्रय**– #
१५/३ **हरि भास्कर**– #
भार्या : माहेर–घैसास.
कन्या :
१) **काशीबाई**–सासर–साने.
२) **अंबू**–सासर–जोशी.
३) **दुर्गा**–सासर–लिमये.
१६/४ **परशुराम हरि**–जन्म ३० ।७ ।१९०६. मृत्यू ६ ।५ ।१९८४. व्यवसाय–गव्हर्मेंट. सर्विस, आय.ए.एस्. डेप्युटी सेक्रेटरी म्हणून रिटायर झाले.
भार्या : **सुशिला**–माहेर–लीला त्रिंबक खरे.
कन्या :
१) **कुंदा**–सासर–जोशी.
२) **उषा**–सासर–जोशी.
३) **पुष्पा**–सासर–जोगळेकर.
१७/५ **मोरेश्वर परशुराम**–जन्म २३ ।५ ।१९३६, वाशीम जिल्हा अकोला (विदर्भ). शिक्षण–बी.एस्सी., एम्.बी.बी.एस्., नागपूर. शास्त्रीय संगीताची व फोटोग्राफीची आवड. व्यवसाय–चर्चगेट व चेंबूर मुंबई येथे डॉक्टरीचा व्यवसाय. वास्तव्य–श्रीमंगेश को. हौ. सो., अहोबिल मठासमोर, डायमंड गार्डन, चेंबूर, मुंबई ४०००७१.
भार्या : **सुरेखा**–माहेर–सुरेखा श्यामराव नाडगौडा.
१८/६ **सचिन मोरेश्वर**–जन्म ३० ।११ ।१९६५.

## घराणे क्रमांक ३

### केळे मजगाव–पुणे–मुंबई




शिक्षण—बी. ई. (कम्युनिकेशन इंजिनियरिंग) सध्या उच्च शिक्षणाकरिता अमेरिकेत वास्तव्य.

१९/२ **नारायण लक्ष्मण–** #

कन्या : **दुर्गाबाई–**

२०/२ **पुरुषोत्तम लक्ष्मण–** #

२१/३ **अनंत पुरुषोत्तम–** #

२२/४ **शिवराम अनंत**–वास्तव्य–मलकापूर. #

## घराणे क्रमांक ३


### केळे मजगांव–पुणे–मुंबई

१/१ **बच्चाजी–** #

२/२ **रघुनाथ बच्चाजी–**हे इ.स. १७७२ मध्ये हयात

## घराणे क्रमांक ३

## केळे मजगाव–पुणे–मुंबई




होते, असे पुरोहितांच्या आधारे बनविलेल्या **वंशावळीवरून** समजतें.

३/३ **बाळकृष्ण रघुनाथ**–हे इ.स. १७९३ मध्ये हयात होते.

४/४ **गोपाळ बाळकृष्ण**– #

५/५ **दामोदर गोपाळ**–यांच्या डॉक्टरी शिक्षणासाठी गोविंद रघुनाथ यांनी बराच खर्च केला होता असे मैत्रेयी विनोद (वेणू अभ्यंकर) यांनी म्हटले आहे.

६/३ **गोविंद रघुनाथ**–हे रत्नागिरी जिल्ह्यातील केळे मजगांव या गावाहून प्रथम पुण्यास आले. केवळ बुद्धिमत्ता, कर्तृत्व आणि आत्मविश्वास एवढ्या भांडवलावर त्यांनी पुण्यात आल्यावर मंडईजवळच्या बारामतीकर दात्यांच्या वाड्यात जागा भाड्याने घेतली. जवळच असलेल्या सरदार खाजगीवाल्यांच्या श्रीरामेश्वरावर त्यांची दृढ श्रध्दा बसली. पुण्यात आल्यापासून नियमितपणे ते मिळवलेल्या प्रत्येक रुपयातील १ पैसा (१ ।६४ रूपया) रामेश्वराजवळ ठेवीत असत. पुढे त्यांना संपन्नता आल्यावर हा निधी वाढत गेला. त्यातून रामेश्वर मंदिरातील (अजुनही उत्तम स्थितीत असलेला) पुढील लाकडी मंडप त्यांनी बांधला. त्यांची भार्या यशोदा ही जुन्या तपकिर गल्लीतील पाळंदे यांची कन्या. त्यांचा विवाह वयाच्या २५ व्या वर्षी झाला. त्यानंतर त्यांची एकसारखी भरभराट होत गेली. संतती, संपत्ती आणि कीर्ती त्यांना मिळाली. सरकार दरबारात व समाजात त्यांना मान मिळाला. ते सरकारी कंत्राटे घेत. पुण्याजवळील कात्रजच्या घाटाला बाजूने भिंती बांधण्याचे काम त्यांनी केले. तसेच बोगदा बांधण्यातही त्यांचा वाटा होता. कंत्राटात भरपूर पैसे मिळत गेल्याने त्यांनी पुण्यात १५/२० घरे, बंगले विकत घेतले. पुण्यातील सचिवांच्या पिछाडीस असलेली सुप्रसिध्द अभ्यंकरांची चाळ नवीन बांधून त्यांचे नातेवाईक (त्यांचा पुतण्या) दामोदरपंत यास

त्यांनी बक्षिस दिली. पुण्यातील पहिली मराठी शाळा या अभ्यंकरांच्या चाळीत सुरू झाली. (रमाबाईसाहेब रानड्यांच्या आठवणीत याचा उल्लेख आहे.)
अशा कर्तबगार व्यक्तीचा वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी प्लेगला बळी पडून इ. स. १८७६ मध्ये आपल्या तरुण पत्नीस व दोन अल्पवयीन पुत्रांना मागे ठेवून मृत्यू झाला. एक महादेव ८ वर्षाचा व दुसरा सदाशिव ६ वर्षाचा होता.

७/४ **महादेव (माधव) गोविंद**–जन्म १८६८, पुणे येथे झाला. मृत्यू १९४२. लहानपणी वडिलांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या आईने या दोन मुलांचा सांभाळ मोठ्या धीराने केला. शिक्षण—इंटर पर्यंत. व्यवसाय—ते सावकारीचा धंदा करीत. वास्तव्य—६२९, शुक्रवार पेठ, पुणे—२. त्यांचा विवाह वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजे १८८७ मध्ये झाला. स्वावलंबन हे माधवरावांचे ब्रीद वाक्य होते. घरातील लाकडे कापणे, फोडणे यापासून मोऱ्या काढण्या पर्यंतची सर्व कामे करण्यासाठी ते कधी अडून रहात नसत. गड्यांजवळ मजुरी पटली नाहीतर 'मी करतो' असे म्हणून स्वतःच कामे करीत. कोर्टातील खटल्यातूनही परावलंबन टाळण्याकरिता ते स्वतःच स्वतःचे खटले चालवित. ते वकील देत नसत. ते लोकमान्य टिळकांचे भक्त होते. लोकमान्यांच्या हयातीत त्यांनी सार्वजनिक कार्यात भाग घेतला. पुणे वसंत व्याख्यान मालेचे चिटणीस म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. उपवक्ते म्हणून त्यांची बरीच प्रसिध्दी होती. वेदशास्त्रोत्तेजक सभा, सार्वजनिक सभा या संस्थांच्या कार्यातही त्यांना रस होता. पुणे नगर वाचन मंदिर, ही त्यांची सर्वप्रिय संस्था. त्यांचा रामायण, महाभारत व भगवद् गीतेचा गाढ अभ्यास होता. त्यांनी "रामाची किष्किंधा", "रामायणानंतरचे महाभारत" या नावाची छोटेखानी प्रबंधवजा पुस्तके प्रसिध्द करून संशोधक बुध्दीचा अविष्कार समाजापुढे ठेवला. त्यांचा 'संस्कृत' भाषेचा अभ्यास दांडगा होता. त्यांचा मृत्यू सन १९४२ मध्ये झाला. त्यांच्या तीन कन्यां पैकी कनिष्ट कन्या वेणू अभ्यंकर विदुषी म्हणून प्रसिध्द होत्या.
भार्या : **रमा**–माहेर—द्वारका पिंपळखरे. पुणे. जन्म १८७३, मृत्यू १२ ।११ ।१९२३.
कन्या :

१) **गंगू (आक्का)** –जन्म १८८७. सासर—लक्ष्मीबाई आत्माराम भिडे, पुणे.
२) **बायजा**–सासर—सरस्वती चिंतामण गोखले, भोर.
३) **वेणू**–जन्म २ ।९ ।१९०८ पुणे येथे झाला. मृत्यू २७ ।६ ।१९८१. शिक्षण—शालेय शिक्षण पुण्याच्या प्रसिद्ध हुजुरपागेत. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाची आवड आणि महत्वाकांक्षा निर्माण झाली. त्यामुळे इ.स. १९२६ च्या मॅट्रिक परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण आणि जगन्नाथ शंकर शेट व इतर शिष्यवृत्या, सुवर्ण पदके इ. सर्व प्राप्त. त्याकाळी स्त्री शिक्षणाचा प्रसार नसतानाही मॅट्रिक मध्ये सर्व प्रथम आल्या म्हणून सर्वात लोकप्रिय व प्रसिध्द. अतिशय हुशार, अभ्यासू आणि जिद्दीच्या म्हणून प्रसिद्ध. इ. स. १९३० मध्ये बी. ए. परीक्षा संस्कृत व इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण. त्यानंतर १९३४-३५ मध्ये एम. ए. व बी. टी. झाल्या. एम. ए. (फक्त संस्कृत विषय घेऊन) व बी. टी. (इंग्रजी, संस्कृत, गणित इ. विषय घेऊन) उत्तीर्ण झाल्यावर सरकारी नोकरी केली. त्यानंतर ट्रेनिंग कॉलेज फॉर वूमेन्स् च्या प्राचार्या झाल्या. नंतर इंन्स्पेक्ट्रेस ऑफ गर्लस् स्कूल या हुद्यावरून निवृत्त. त्यांचा विवाह त्या वेळच्या काळानुसार थोडा उशिरा म्हणजे वयाच्या २८ व्या वर्षी इ. स. १९३७ मध्ये न्यायरत्न धुंडीराज शास्त्री विनोद या विद्वान् गृहस्थाशी झाला. त्यांचें सासरचे नाव मैत्रेयी विनोद. पूणा वूमेन्स कौन्सिल, युनिव्हर्सिटी वूमेन्स असोसिएशन, पुणे विद्यापीठ, बहिःशाल व्याख्यानमाला यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध होता. अगदी लहानपणापासून वडिलांबरोबर भारतात व विवाहानंतर परदेशात अनेक ठिकाणी त्यांचा प्रवास झाला. अमेरिकन विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीच्या अभ्यासात त्यांनी मार्गदर्शन केले. भारतीय सांस्कृतिक जीवनाच्या पुरस्कर्त्या म्हणून गाजलेले व्यक्तिमत्व असे थोडक्यात त्यांचे वर्णन करता येईल.

८/५ **रामचंद्र महादेव**–जन्म भाऊबीज इ. स. १८८५. पुणे येथे. मृत्यू ४ ।२ ।१९६५. शिक्षण—हे वयाच्या १५ व्या वर्षी मॅट्रिकला होते. त्यावेळी १६ वे वर्ष पूर्ण झाल्याशिवाय मॅट्रिकला बसू देत नसत. म्हणून मॅट्रिकला बसता आले नाही. म्हणून इंजिनिअरींग कॉलेजात एल. इ. इ. व एल. एम्. इ. हे कोर्स पूर्ण केले.

सर्व परिक्षांत फर्स्ट क्लास फर्स्ट - ९५% मार्कांनी उत्तीर्ण झाले. आपणास सर्वच्या सर्व म्हणजे ९५% (५ मार्क टायपिंग साठी डिस्क्रीशिनरी असत.) मार्क मिळतील असा त्यांचा ठाम विश्वास असे. यांचे वडलांशी पटत नसे. वास्तव्य—पुणे.
भार्या : **सीताबाई**—जन्म २० ।१० ।१८९८. मृत्यू ५ ।६ ।१९६३. माहेर—यमुना मोरेश्वर फडके. पिता—श्री. मो. ना. फडके, जुना ५७५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे. यांना ६ पुत्र व ५ कन्या होते.
कन्या :
१) **शांता**—वयाच्या ५ व्या वर्षी मृत्यू.
२) **सुमती**—जन्म १९२७. वर्धा येथे. सासर—सुमती विनायक साठे. 'सतिश बंगला', पानमळा कॉलनी, पुणे.
३) **कुसुम**—जन्म ३० ।४ ।१९३४ पुणे येथे. शिक्षण—बी. ए. सासर—कुसुम प्रभाकर जोशी. मूळगांव पंढरपुर, सध्या एन्. आर. सी. मोहने कल्याण येथे वास्तव्य—पुण्यात 'ॐकार' बंगला, आळंदी रोड येथे आहे.
४) **विमल**—जन्म १० ।८ ।१९३४ धारवाड येथे. सासर—विमल संतोषकुमार चौधरी. पति—संतोषकुमार के. चौधरी. (बंगाली) एन्. आर. सी. मध्ये कॅन्टीन सुपरवायझर होते. वास्तव्य—अंबरनाथ (पश्चिम).
५) **हेमलता**—जन्म २६ ।१२ ।१९३७. निपाणी येथे. सासर—रोहिणी मनोहर जोशी. वास्तव्य—करोल बाग, दिल्ली.
९/६ **गणेश रामचंद्र**—जन्म गणेश चतुर्थी ६ ।९ ।१९१८. मृत्यू २ ।३ ।१९८७. शिक्षण—इंटर आर्टस् पर्यन्त, हिस्लाप कॉलेज, नागपूर. व्यवसाय—महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मध्ये लिपिक व ऑडिटर. वास्तव्य—पुणे.
भार्या : **उषा**—जन्म २ ।२ ।१९२६. माहेर—यमुना बळवंत वेलणकर. विवाह १९४४ साली. माहेर—पेरूगेट, भावे स्कूल जवळ, पुणे.
१०/७ **चंद्रशेखर गणेश**—जन्म ३१ ।५ ।१९४९. शिक्षण—११ वी पास. व्यवसाय—खाजगी कंपनीत कल्याण येथे नोकरी. वास्तव्य—१३, जीवनदीप, नांदिवली रोड, हनुमान नगर, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **स्मिता**—माहेर—कल्पना सदाशिव वैद्य.
कन्या : **रूपाली**—जन्म ३१ ।१२ ।१९७६. शिक्षण—६ वी.
पुत्र : **राहुल**—जन्म १५ ।१० ।१९८२.
११/७ **अमित गणेश**—जन्म १२ ।८ ।१९५१. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मध्ये नोकरी. वास्तव्य—बी-३-२५-१ सिडको कॉलनी, नाशिक.
१२/७ **दिलीप गणेश**—व्यवसाय—नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन मोहने, कल्याण येथे नोकरी. वास्तव्य—एफ्. १/१०, एन्. आर. सी. कॉलनी, मोहने, कल्याण.
१३/६ **वसंत रामचंद्र**—मृत्यू २२ ।५ ।१९५४, मुंबई येथे. शिक्षण—इंटर सायन्स. हायस्कूल व कॉलेजमध्ये असताना क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, हुतूतू, खो-खो, आट्या पाट्या, यांत टीम कॅप्टन असे. तसेच बॉक्सिंग, रेसिंग, शूटींग, रनिंग आणि इतर अनेक खेळात भाग घेऊन अनेक बक्षिसे मिळवली. नागपूरला असताना जातीय दंगलीतील मारामारीत सापडले. नाक फ्रॅक्चर झाले होते. नंतर बी. आय्. इ. टी. चा स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगचा कोर्स पूर्ण केला. दि. २२.५.१९५४ रोजी मुंबईत वडाळा येथे फॅक्टरी मध्ये काम करताना अपघात झाला. व त्यात मृत्यू आला. वास्तव्य—मुंबई.
भार्या : माहेर—केळकर. शिक्षण—बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर. धांगध्रा संस्थानचे चीफ गार्डन ऑफिसर यांची कन्या.
१४/७ **अरुण वसंत**—जन्म २७ ।५ ।१९४८ मृत्यू १ ।११ ।१९७७. शिक्षण—बी. कॉम. व्यवसाय—किर्लोस्कर कंपनी, पिंपरी येथे परचेस ऑफिसर होते. विवाहाचे नंतर केवळ चार महिन्यात हॉर्ट अटॅकने मृत्यू.
भार्या : पतिचे निधनानंतर (अपत्य नाही) पुनर्विवाह केला.
१५/७ **अशोक वसंत**—शिक्षण—बी. एस्सी. व्यवसाय—बोरिंजर कनॉल मध्ये रीजनल मॅनेजर. वास्तव्य—११ए, सुमन सदन, पेस्टन सागर रोड नं. ५, घाटकोपर—माहुल रोड, चेंबूर, मुंबई—८९.
१६/६ **यशवंत (मधुकर) रामचंद्र**—जन्म ८ ।६ ।१९२४ पुणे येथे. शिक्षण—बी. एस्सी. व्यवसाय—लॅण्ड रेकॉर्डस मध्ये डेप्युटी डायरेक्टर या हुद्यावरून निवृत्त. वास्तव्य—१८, आदर्श सोसायटी.

सातारा रोड, पुणे.
भार्या : **सुलभा**–जन्म १ ।१० ।१९२७.
माहेर–ॲडव्होकेट करंदीकर, बेळगांव, यांची कन्या.
अपत्य नाही.
१७/६ **केशव (प्रभाकर) रामचंद्र**–जन्म २ ।१२ ।१९२५ अमरावती येथे. शिक्षण–१९४७ मध्ये बी. एस्सी. ॲग्रिकल्चर. लहानपणी बॉय स्काऊट, महाराष्ट्र मंडळ रा. स्व. संघ, हनुमान व समर्थ व्यायाम शाळा, इ. मध्ये भाग. शिवाय पोहणे, सायकलने गड - किल्ले पाहणे, पुणे - मुंबई सायकल फेऱ्या आणि तिरकंबठ्याने शिकार इ. मध्ये खूप आवडीने सहभाग. व्यवसाय–१९४७ ते १९५० ऊस संशोधन शेतकी अधिकारी. नंतर १९५० ते १९८३ पोलिस अधिकारी म्हणून नोकरी. १९४८ मध्ये गांधीवधानंतर रा. स्व. संघाचे 'क्रियाशील कार्यकर्ता' म्हणून प्रिव्हेंन्टिव्ह डिटेंन्शन म्हणून स्थानबध्द. कायद्याचे चौकटीत काम. वरिष्ठांचे कायद्या विरूध्दचे आदेश न मानणे, स्पष्ट वक्तेपणा, प्रामाणिकपणा इ. मुळे नोकरीत वारंवार बदल्या. वास्तव्य–२ ।बी ।२० रुणवाल नगर, प्रताप टॉकीज मागे, ठाणे - १.
भार्या : **स्नेहलता**–माहेर–सिंधु अनंत करंदीकर. जन्म १३ ।६ ।१९३०. मृत्यू ७ ।९ ।१९७४ बुलढाणा येथे. सांगली येथे विवाह–१५ जुलै १९४८. पिता–अनंत गोपाळ करंदीकर. प्रिन्सिपॉल सिटी हायस्कूल, सांगली.
१८/७ **हेमंत केशव**–जन्म २१ ।५ ।१९४९ सांगली येथे. शिक्षण–एम्.ई.इलेक्ट्रिकल. व्यवसाय–प्रथम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये इलेक्ट्रॉनिक्स खात्याचा प्रमुख. नंतर तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी, वारणानगर, जि. कोल्हापूर येथे व्हाईस प्रिन्सिपॉल आहेत.
भार्या १) : **प्रभा काळे**–बी. ए. (घटस्फोट घेतला).
कन्या : **किरण**–
भार्या २) : **चित्ररेखा**–सासर–चित्ररेखा कमलाकांत राव. संतपूर, रा. ब्राह्मणवाडी, नारायण पेठ. जि. मेहबूब नगर, आंध्र प्रदेश.
कन्या : **श्रीलेखा**–जन्म २२ ।६ ।१९८४, सांगली येथे.
पुत्र : **अखिलेश**–जन्म १७ ।९ ।१९८८, सांगली येथे.
१९/७ **सुरेश केशव**–जन्म ६ ।९ ।१९५१. सांगली येथे. व्यवसाय–हिंन्दुस्तान मिल्क फूड मॅनुफॅक्चररर्स लि. कंपनीत सिनियर सेल्स एक्झिक्युटिव्ह. सध्या जायंटस् क्लबचे प्रेसिडेंट आहेत. वास्तव्य–२ ब २०, रुणवाल नगर, प्रताप टॉकीज मागे, ठाणे.
भार्या : **माणिक**–माहेर–माणिक मंगलमूर्ती वरणगांवकर. रा. जलंब. जि. बुलढाणा. सरस्वती हायस्कूल (इंग्रजी माध्यम) मध्ये ठाणे येथे शिक्षिका.
कन्या : **सुप्रिया**–जन्म २ ।८ ।१९७८ बोरिवली येथे. होलिक्रॉस हायस्कूल, ठाणे, येथे इ. ७ वीत शिकत आहे.
पुत्र : **रोहित**–जन्म ५ ।१० ।१९८०. सरस्वती विद्या मंदिर, ठाणे (इंग्रजी माध्यम) मध्ये इ. ४ थीत शिकत आहे.
२०/७ **राजीव केशव**–जन्म २९ ।७ ।१९५३. व्यवसाय–बी.एच्.ई.एल्. मध्ये मॅनेजर. वास्तव्य–डी ६ ।१२, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ क्वार्टर्स खापरखेडा, नागपूर ४४११०२.
भार्या : **स्मिता**–माहेर–स्मिता दिवाकर पाचपोर. पिता-दिवाकर नथ्थु पाचपोर. रा. जलंब जि. बुलढाणा. (पोलिस इन्स्पेक्टर).
कन्या :
१) **पल्लवी**–जन्म १० ।१२ ।१९७८. सेन्ट्रल स्कूल मध्ये इ. ६ वीत शिकत आहे.
२) **मधुरा**–जन्म २७ ।९ ।१९८१.
पुत्र–**श्रीकांत**–जन्म १९ ।७ ।१९८५.
२१/६ **नारायण रामचंद्र**–जन्म १२ ।६ ।१९३०, पुणे येथे. शिक्षण–बी. ए. एल्. एल्. बी. व्यवसाय–युको बँकेत पुणे येथे मॅनेजर. वास्तव्य–"देवाशिष" बंगला, प्लॉट नं. ५१, 'स्वाती' सोसा. पद्मावती, पुणे.
भार्या : **लक्ष्मी**–जन्म १० ।२ ।१९३६. माहेर–लीला. हरि विठ्ठल फडके यांची कन्या.
२२/७ **आशिष नारायण**–जन्म ४ ।३ ।१९६५. पुणे येथे.
भार्या : **मधुरा**–जन्म १४ ।३ ।१९६५. श्री. कृष्णाजी बापूराव सदावर्ते, पुणे यांची कन्या. विवाह १९ ।४ ।१९८८, पुणे येथे.
२३/७ **देवेश नारायण**–जन्म २९ ।९ ।१९६६, पुणे.
२४/६ **ज्ञानकुमार रामचंद्र**–जन्म ७ ।१२ ।१९३९, निपाणी येथे. शिक्षण–मेकॅनिकल ड्राफ्टस्मन व्हल्कन

लेवल कं. पुणे येथे नोकरी. वास्तव्य–जुना घर नं. ९२४, सदाशिव पेठ, गोखले हॉल समोर, पुणे.
हल्ली–कोथरूड, पुणे-२९.
भार्या : **जयश्री–**माहेर–रानडे.
कन्या : **मनिषा–**
२५/७ **महेश ज्ञानकुमार**–शिक्षण–सिव्हिल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा.
२६/५ **लक्ष्मण महादेव–**जन्म १८७०. मृत्यू २५ ।४ ।१९५७. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–सरकारी नोकरी. वास्तव्य–पुणे.
भार्या : **सावित्री–**माहेर–घारूताई खरे. मोहोपाडा, ता. कर्जत.
२७/६ **मुकुंद लक्ष्मण–**जन्म १२ ।२ ।१९३७. शिक्षण–एम्.ए., पी.एच्.डी., एल्.एल्.बी. व्यवसाय–पत्रकार, दैनिक 'पिंपरी–चिंचवड समाचार' चे संपादक. वास्तव्य–ए/२९, कुसुम को. ऑ. हौ. सो. मॉडेल कॉलनी, पुणे ४११०१६.
भार्या : **अंजली–**वय ४४ वर्षे. माहेर–शामला केशव सबनीस. पुणे. शिक्षण–बी.एस्सी. (होम सायन्स).
कन्या : **अश्विनी–**जन्म- २५ ।८ ।१९६५.
सासर–**अश्विनी** प्रदिप हर्डीकर पुणे. शिक्षण–डिप्लोमा इन् कॅटरींग अँड फूड टेक्नॉलॉजी.
२८/७ **अभिजीत मुकुंद–**जन्म ८ ।१० ।१९७०. शिक्षण–कॉलेजचे दुसरे वर्ष. वास्तव्य–१८७५, सुझेट सर्कल, सॉल्ट लेक सिटी, यूटाह स्टेट, यू.एस्.ए. (अमेरिका).
२९/६ **आनंद लक्ष्मण–**जन्म २९ ।११ ।१९३३. शिक्षण–इंजिनिअर. पुणे युनिव्हर्सिटी. १९५६ मध्ये इंजि. कॉलेज पुणे येथे डी.एम्.इ., फर्स्ट क्लास फर्स्ट. व्यवसाय–प्रिमियर ऑटोमोबाईलस्, लि. कुर्ला. वास्तव्य–२५/२९६ सहकार नगर नं.१, चेंबूर, मुंबई–७१.
भार्या : **निलीमा–**माहेर–लीला गजानन बाळ, गुहाघर जि. रत्नागिरी.
३०/७ **हेमंत आनंद**–जन्म १४ ।६ ।१९६१. शिक्षण–बी.ई., एम्.एफ्.एम्. व्यवसाय–प्रीमीयर ऑटोमोबाईल कं. त नोकरी.
३१/७ **जयंत आनंद–**जन्म ७ ।१० ।१९६३. व्यवसाय–भारत पेट्रोलियम मध्ये नोकरी.
३२/६ **महादेव (राजन्) लक्ष्मण–**मृत्यू १९८८ पुणे. वास्तव्य–अप्पा बळवंत चौक, बाजीराव रोड, पुणे.
३३/४ **सदाशिव गोविंद–**जन्म १८७०. मृत्यू १९२०. शिक्षण–पदवीधर होते. व्यवसाय–शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल पुणे येथे, नंतर अहमदनगर येथे शिक्षक, पुन्हा पुण्यास आगमन.
कन्या :
१) **यमूताई–**मृत्यू १९८२. सासर–जोग. पुणे.
२) **अंबूताई–**मृत्यू १९७५. सासर–पिंपळखरे. पुणे.
३) **काशीताई–**मृत्यू १९७८. अविवाहित.
४) **वत्सलाताई–**सासर–परचुरे. गोरेगांव.
५) नाव माहित नाही. मृत्यू १९२५. सासर–जोशी.
६) नाव माहित नाही.
७) **दुर्गा–**सासर–भट.
३४/५ **वामन सदाशिव–**
भार्या : **लीला–**माहेर–दुर्गा अनंत फडके.
कन्या :
१) **अलका–**सासर–कल्पना अनंत कुलकर्णी. सांगली.
२) **मंगला–**सासर–जयश्री प्रभाकर गोखले. पुणे.
३) **रोहिणी**–सासर–रोहिणी चंद्रशेखर अय्यर. पुणे.
४) **वासंती–**सासर–मीनल माधव जोशी. पुणे.
५) **निर्मला–**सासर–शीतल प्रकाश डांगे. अहमदनगर.
३५/६ **देवदत्त वामन**–वास्तव्य–प्लॉट नं. १२, मानस–सौष्ठव, बिबवेवाडी, पुणे.
भार्या : **शुभांगी–**माहेर–पाध्ये.
कन्या : **ऋचा**–वय वर्षे २.
३६/६ **अविनाश वामन–**जन्म १ ।१० ।१९४१. शिक्षण–बी.एस्सी. (ऑनर्स.) व्यवसाय–शिकवण्या घेतात. वास्तव्य–८३२ ।अ 'श्रीकृपा' शाहूपुरी, चौथी गल्ली, कोल्हापूर.
भार्या : **वैजयंती**–माहेर–मीनाक्षी कृष्णाजी कानिटकर.
३७/७ **अमेय (तुषार) अविनाश–**जन्म ६ ।४ ।१९८४.
३८/५ **कृष्णाजी सदाशिव–**मृत्यू १६ ।६ ।१९६५.
भार्या : **लक्ष्मी**–माहेर–दुर्गा विठ्ठल वैशंपायन.
कन्या :
१) **प्रभा–**सासर–पानवलकर.

२) **नीरा**–सासर–फडके.
३) **सुधा**–सासर–देशपांडे.
४) **रजनी**–सासर–दामले.
३९/६ **यशवंत कृष्णाजी**– जन्म २६ ।४ ।१९२७.
शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–नेव्हल डॉकयार्ड को. ऑप. बँक लि. लायनगेट, मुंबई येथे नोकरी.
वास्तव्य–यशवंत भुवन, ब्राह्मणवाडी, मो. ना. पाटणकर मार्ग, कुर्ला (प.) मुंबई- ७०.
भार्या :**शरयू**–माहेर–शरयू महादेव केळकर.
४०/७ **अजय यशवंत**–जन्म १ ।११ ।१९५८.
शिक्षण–डिप्लोमा इन ऑफसेट प्रिंटिंग.
व्यवसाय–स्वतःचा छापखाना कुर्ला येथे आहे.
वास्तव्य–यशवंत भुवन, ब्राह्मणवाडी, कुर्ला (प.) मुंबई–७०.
भार्या : **अंजली**–माहेर–भावे. पुत्र–**निखिल**–जन्म ९ ।६ ।१९८७.
४१/७ **अतुल यशवंत**–जन्म १८ ।६ ।१९७०.
शिक्षण–केमि. इंजि. डिप्लोमा, प्रथम वर्ष.
४२/६ **अनंत कृष्णाजी**–जन्म २७ ।८ ।१९३७.
शिक्षण–बी.ई. (मेकॅ.) व्यवसाय–फौन्ड्री मॅनेजर, गुजरात मध्ये, सध्या पुणे येथे नोकरी. वास्तव्य–३३१ नारायण पेठ, गणेश अपार्टमेंट, मोदी गणपतीच्या मागे, पुणे–३०.
भार्या : **सुलोचना**–माहेर–मालती थत्ते.
कन्या : **मनिषा**–जन्म २४ ।१२ ।१९६५. शिक्षण–बी. एस्सी., डी. एम्. एल्. टी.
४३/७ **महेश अनंत**–जन्म ५ ।११ ।१९६३.
शिक्षण–बी. ई. (मेकॅ.)
४४/५ **विष्णू सदाशिव**– #
भार्या : **सुशिला**–माहेर–शांता मोरेश्वर गोखले.
कन्या :
१) **जया**–जन्म १९४८. सासर–गोखले.
२) **विजया**–जन्म १९४९. सासर–भिंगारे.
४५/६ **रवींद्र विष्णू**–जन्म २६ ।११ ।१९५१.
शिक्षण–बी.ई. (मेकॅ.) व्यवसाय–पेट्रोफिल्स को. ऑप. लिमीटेड, बडोदा येथे नोकरी. वास्तव्य–३२ उदय पार्क सोसा, न्यू. इंडिया मिल रोड, बडोदा, गुजराथ–३९०००५.
भार्या : **सुनन्दा**–माहेर–सुनन्दा गणेश जोगळेकर.
४६/७ **अनिकेत रवींद्र**–वय वर्षे ८.
४७/५ **नरहर सदाशिव**–अविवाहित.


## घराणे क्रमांक ४

## केळे मजगांव–पंढरपूर–बडोदे

१/१ **रघुनाथ**– #
२/२ **कृष्ण रघुनाथ**– #
३/३ **हरि कृष्ण**–यांना ४ पुत्र होते.
४/४ **घनःश्याम हरि**–जन्म १८८३. मृत्यू इ.स. १९३४. केळे येथे शेती करीत होते व पोलीस पाटील होते. अधिक माहिती नाही.
भार्या : **सत्यभामाबाई**–माहेर–गोदावरी केळकर, मालगुंड.
कन्या :
१) **शांताबाई**–सासर–काणे.
२) **ताई**–सासर–गोडबोले.
३) **गंगू**–सासर–करंदीकर, केळे–मजगांव.
४) **सुशीला**–सासर–देशमुख, पुणे.
५/५ **दत्तात्रय घनःश्याम**–जन्म इ. स. १९१७ केळे मजगांव येथे झाला. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–असि. कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स या पदावरून निवृत्त. नंतर विक्रिकर सल्लागार. कुस्तीची आवड, अनेक पदके मिळविली. शून्यातून स्वतःच्या हिंमतीवर शिक्षण व संसार करून प्रथम श्रेणीचे अधिकारी झाले.
वास्तव्य–प्रथम बडोदे येथे होते. निवृत्त झाल्यावर १२, जयदत्त, मनिषानगर, पंढरपूर, जि. सोलापूर येथे.
भार्या : **जयश्री**–माहेर–कुसुम कृष्णाजी जोशी रा. (कऱ्हाड). मृत.
कन्या :
१) **सुलोचना**–जन्म इ.स. १९४९. अविवाहित.
२) **रोहिणी**–जन्म इ.स. १९६९. सासर–रोहिणी विलास चितळे.
६/६ **विश्वास दत्तात्रय**–जन्म इ.स. १९५३.
व्यवसाय–उज्जैनी येथे सरकारी नोकरी,
वास्तव्य–पंढरपूर

## घराणे क्रमांक ४

### केळे मजगाव–पंढरपूर–बडोदे




भार्या : **विद्या**–इतर माहिती नाही.
पुत्र : १) **अभिजीत**– २) **अमोल**–
७/६ **विवेक दत्तात्रय**–जन्म इ.स. १९५५.
व्यवसाय–युनायटेड वेस्टर्न बँकेत पंढरपूर येथे नोकरी.
वास्तव्य–पंढरपूर
भार्या : **मंजू**–यांना १ कन्या व १ पुत्र.
कन्या : **केतकी** पुत्र–**संग्राम**
८/६ **संजय दत्तात्रय**–जन्म इ.स. १९५७. व्यवसाय–कर सल्लागार व नगरसेवक. वास्तव्य–पंढरपूर
भार्या : **स्मिता**–
पुत्र : **विक्रम**–
९/५ **दिगंबर घनःश्याम**–जन्म इ.स. १९२३. मृत्यू १९४७.

१०/५ **नारायण घनःश्याम**–जन्म २२।११।१९२५. शिक्षण–मराठी ४ थी. व्यवसाय–बडोदे येथे फायर ब्रिगेड मध्ये नोकरी इ.स. १९८५ मध्ये निवृत्त.
वास्तव्य–१७० हरि ओम् नगर, रेसकोर्स जवळ, आत्मज्योती आश्रमाजवळ, बडोदे - ७.
भार्या : **लीलाबाई**–माहेर–लीला वामन केळकर. मालगुंड.
कन्या :
१) **सुमन**–जन्म इ.स. १९५२. शिक्षण–एस्. एस्. सी., सासर–सुमन डाह्याभाई पटेल, बाजवा. जि. बडोदे, गुजराथ.
२) **रंजना**–जन्म १९६२. सासर–रंजना किशोर गायकवाड. बाजवा. जि. बडोदे, गुजराथ.


११/६ **श्रीधर नारायण**–जन्म इ.स. १९५८. शिक्षण–१० वी पर्यंत. व्यवसाय- सुरत येथे फायर ब्रिगेडमध्ये नोकरी.
भार्या : **रीता**–माहेर–रीता शंकर कुलकर्णी. सेवासी गोमी, बडोदे.
पुत्र : **हिरेन्**–जन्म १२ ।५ ।१९८९.
१२/६ **राजेन्द्र नारायण**–जन्म इ.स. १९६६. व्यवसाय–रिक्षा चालविण्याचा.
१३/६ **जितेन्द्र नारायण**–जन्म इ.स. १९६९. शिक्षण–१० वी पर्यंत. व्यवसाय–प्रिंटिंग प्रेसमध्ये नोकरी.
१४/४ **कृष्ण हरि**– #
१५/४ **विष्णू हरि**– #
१६/५ **दत्तू विष्णू**–कन्या दोन, पुत्र अपत्य नाही.
१७/४ **मुकुंद हरि**– #

## घराणे क्रमांक ५.

## केळे मजगांव–बडोदे

१/१ **हरि**– #
२/२ **धोंडो हरि**– #
कन्या : **शारदा**–सासर–शारदा महादेव जोशी.
३/३ **विष्णूपंत धोंडो**– #
कन्या :
१) **प्रमिला**– #
२) **उषा**– #
३) **कुसुम**– #
४/४ **गजानन विष्णू**- # मुका. अविवाहित.
५/४ **नीळकंठ विष्णू**–जन्म जून १९३५. संगमेश्वर,रत्नागिरी येथे. शिक्षण– एस्. एस्. सी. व्यवसाय–अकौंटस् डिपार्टमेंट, साराभाई केमिकल्स, बडोदे येथे नोकरी. नाटकाचे दिग्दर्शन, बुध्दिबळ इ. आवड. वास्तव्य–'विष्णू स्मृती', शंकर टेकडी, दांडिया बाजार, बडोदे–३९०००१.
भार्या : **शैलजा**–माहेर–रत्नप्रभा यशवंत फडके. शिक्षण–बी. ए.; बी. एड्. शिक्षिका. महाराणी चिमणाजी हायस्कूल, सलाटवाडा. बडोदे.
६/५ **मोहन नीळकंठ**–जन्म २१ ।७ ।१९६५. शिक्षण–बी. एस्सी.
७/५ **अजित नीळकंठ**–जन्म १३ ।२ ।१९७०. शिक्षण–टी. वाय. बी. एस्सी.
८/५ **प्रशांत नीळकंठ**–जन्म २७ ।१ ।१९७२. शिक्षण–एफ्. वाय्. बी. एस्सी.
९/४ **मनोहर विष्णू**–जन्म १४ ।१० ।१९३६. शिक्षण–नॉन मॅट्रिक. व्यवसाय–श्रीराम प्रोसेस प्रिंटिंग वर्क्स, बडोदे मध्ये नोकरी. वास्तव्य–बी-१३, दुर्वांकुर अपार्ट, खारीबाव रोड, रावपुरा, बडोदे - १.
भार्या : **सरला**–माहेर–नलिनी रामचंद्र चावरे, बडोदे.
१०/५ **संतोष मनोहर**–जन्म ३१ ।३ ।१९७७. इ. ८ वी मध्ये शिकत आहे.
११/४ **प्रभाकर विष्णू**–जन्म १९३८ बडोदे येथे. शिक्षण–एस्.एस्.सी, डी.एड. व्यवसाय–लध्दाराम सिंधी हायस्कूल मध्ये ड्रॉईंग टीचर. चित्रकला, कॅरम खेळणे इ. आवड. वास्तव्य–'प्रविणी' अपार्ट. मार्केट पोलिस चौकी जवळ, राजमहल रोड, बडोदे.
भार्या : **शशिकला**–
कन्या : **अलका**–जन्म १९७२. इ. १२ वी मध्ये शिकत आहे.
१२/३ **महादेव धोंडो**– #
कन्या : **भारती**–
१३/४ **नंदकिशोर महादेव**–जन्म २७ ।४ ।१९५६. मूर्तिजापूर येथे. शिक्षण–एफ्. वाय्. बी. कॉम. व्यवसाय–अन्योन्य सहाय्यकारी मंडळी, (बँक) बडोदे येथे नोकरी. क्रिकेटची आवड. वास्तव्य–देशपांडे वाडा, खत्री पोळ, ज्युबेली बागेच्या मागे, बडोदे.
भार्या : **देवयानी**–माहेर–देवयानी प्रभाकर जोशी, बडोदे.
कन्या : **सुजला**–जन्म १० ।९ ।१९८८.
१४/५ **प्रसन्ना नंदकिशोर**–जन्म २८ ।४ ।१९८०. इ. ५ वीत शिकत आहे.
१५/३ **नारायण धोंडो**–जन्म १७ ।१२ ।१९२४ बडोदे येथे. शिक्षण–इंटर आर्टस. व्यवसाय–महाराज सयाजीराव युनिव्हर्सिटी मध्ये स्टोअर कीपर. आता निवृत्त. वास्तव्य–अ १६/२, शास्त्रीपार्क कॉलनी, आर्य कन्या विद्यालयाच्या मागे, कारेलीबाग, बडोदे–४.

## घराणे क्रमांक ५
## केळे मजगाव-बडोदे




भार्या : **निर्मला**-माहेर-यमुना. पनवेल.
कन्या : **भाग्यश्री**-सासर-भाग्यश्री भानुदास मराठे. शिक्षण-एम्. ए; बी. एड्. पति-भानुदास मराठे. एम्. **कॉम्**, एल्. एल्. बी. व्यवसाय-महाराष्ट्र बँकेत नोकरी. कारेली बाग, शास्त्रीपार्क, हरणी, जव्हेरी नगर, बडोदे.
१६/४ **कृष्णकुमार नारायण**-शिक्षण-एम्. एस्सी, बी. एड्.


## घराणे क्रमांक ६.

## केळे मजगांव रत्नागिरी-मालवण

**विष्णू (बाबा)** -हा या घराण्याचा मूळ पुरूष. केळे मजगांव येथे या कुटुंबातील गजानन रामचद्रं अभ्यंकर यांचे वास्तव्य असून स्वत:चे घर शेतीवाडी आहे. या घरातील पति पत्नि व दोन्ही पुत्र मुके असून शेतीवाडी आणि घर व्यवस्थितपणे सांभाळले जाते. या घराण्यातील व्यक्ति गुहागरचा व्याडेश्वर आणि आंबेजोगाईची जोगेश्वरी ही कुलदैवते मानतात.
१/१ **विष्णू (बाबा)** -ज्ञात मूळपुरुष
२/२ **रामचंद्र बाबा**- #
३/३ **गोविंद रामचंद्र**- #
भार्या : **राधाबाई**-माहेर-कृष्णा गणेश करमरकर.
४/४ **रामचंद्र गोविंद**-जन्म १९१०. मृत्यू १९४५. व्यवसाय-शेती व भिक्षुकी.
भार्या : **सीताबाई**-माहेर-तारा प्रभाकर मराठे, कुर्धे.
कन्या :
१) **आवडी**-सासर-भावे.
२) **गंगू**-सासर-करमरकर.
३) **अंबी**-सासर-कोल्हटकर.
५/५ **गजानन रामचंद्र**-जन्म १९३५. मुका. व्यवसाय-शेती. वास्तव्य-मु. पो. केळे, ता. जि. रत्नागिरी.
भार्या : **विनया**-माहेर-दिपा दत्तात्रय साठे. लवेल.
६/६ **आनंदा गजानन**-जन्म १९६८. मुका. व्यवसाय-रत्नागिरी येथे नोकरी.

## घराणे क्रमांक ६

### केळे मजगाव–रत्नागिरी–मालवण




७/६ **सुगंध गजानन**–जन्म १९७०. मुका आहे. वास्तव्य–उल्हासनगर येथे. शिकत आहे.

८/५ **नरहर रामचंद्र**–जन्म ११ ।८ ।१९३७. शिक्षण–एम्.ए., बी.एड्. राष्ट्रभाषा पंडित. व्यवसाय–न्यू. इं. स्कूल येथे माध्यमिक शिक्षक, पाटपन्हाळे. वास्तव्य–मु. पो. शृंगारतळी, ता. गुहागर, जि. रत्नागिरी. भार्या : **शुभांगी**–माहेर–शकुंतला दत्तात्रय पाटणकर. ता. अरवली, संगमेश्वर. कन्या : **वर्षा**–वय १९ वर्षे. शिक्षण–१२ वी.

९/६ **वैभव नरहर**–वय २१ वर्षे. वास्तव्य–कॉम्प्युटर डिग्रीसाठी रशिया येथे.


१०/५ **माधव रामचंद्र**–जन्म १० ।४ ।१९३९. मृत्यू ६ ।७ ।१९८२. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–विमा विकास अधिकारी. वास्तव्य–'मधु–माधव' गुरुजन को. ऑ. हौ. सो. उद्यमनगर, रत्नागिरी. भार्या : **मधुस्मिता**–व्यवसाय–एल्.आय.सी. मध्ये नोकरी, रत्नागिरी. माहेर–उषा श्रीपाद पुराणिक. वेंगुर्ला. कन्या : **हेमांगी**–जन्म २८ ।१२ ।१९६९. शिक्षण–एस्. वाय. बी. एस्सी.

११/६ **धनंजय माधव**–जन्म २३ ।७ ।१९७१. शिक्षण–फर्स्ट ईयर बी.ई.

१२/५ **यशवंत रामचंद्र**–जन्म २२ ।११ ।१९४०. शिक्षण–एस्. एस्. सी., डी. एड्. व्यवसाय–प्राथमिक शिक्षक. वास्तव्य–मु. पो. वेतोशी, ता. जि. रत्नागिरी. भार्या : **सुचेता**–माहेर–प्रभावती यशवंत मुंडले, कासार्डे. कन्या : **कीर्ती**–शिक्षण–इयत्ता २ री.

१३/६ **सागर यशवंत**–जन्म मार्च १९७२.

## घराणे क्रमांक ७
## केळे मजगांव-डोंबिवली-मुंबई




शिक्षण—१२ वी.
१४/६ **भूषण यशवंत**—जन्म १८ ।१ ।१९७६. शिक्षण—इयत्ता ८ वी.
१५/५ **वसंत रामचंद्र**—जन्म १८ ।१० ।१९४२. केळे येथे. शिक्षण—एम्.ए. व्यवसाय—प्राध्यापक व उपप्राचार्य, सिंधुदुर्ग कॉलेज, मालवण. व्याख्यान, अभिनय व समाजसेवा यांची आवड. वास्तव्य—मु. पो. मालवण, जि. सिंधुदुर्ग ४१६६०६.
भार्या : **वैशाली**—माहेर—मीना परशुराम जोशी, हुबळी.
कन्या : **मृदूला**—जन्म १४ ।९ ।१९७१. शिक्षण—फर्स्ट इयर बी. ए. एम्. एस्.
१६/६ **महेश वसंत**—जन्म १ ।११ ।१९७३. शिक्षण—१० वी.
१७/३ **गोपाळ रामचंद्र**—माहिती मिळाली नाही.
१८/४ **सदाशिव गोपाळ**—यांचे वास्तव्य मलकापूर जि. कोल्हापूर येथे होते.
१९/२ **श्रीधर विष्णू**—माहिती मिळाली नाही.
२०/३ **महादेव श्रीधर**—माहिती मिळाली नाही.
२१/२ **त्रिंबक विष्णू**—माहिती मिळाली नाही.

## घराणे क्रमांक ७.

## केळे मजगांव-डोंबिवली-मुंबई

१/१ **महादेव**— #
२/२ **रघुनाथ महादेव**— #
३/३ **दत्तात्रय रघुनाथ**— #
४/४ **गोविंद दत्तात्रय**—जन्म १९०४. मृत्यू ६ ।७ ।१९६९.
भार्या : **इंदिरा**—माहेर—इंदुताई दत्तात्रय सप्रे.
कन्या :
१) **शरयू**—जन्म १९३१. मृत्यू जून १९८७. सासर—जोशी.

२) **उषा**–जन्म १९४३. सासर–सुनिता विनायक जोशी. पुणे.
३) **नलिनी**–जन्म १९४६. सासर–गायत्री यज्ञेश्वर भिडे. पुणे.
५/५ **कृष्णा गोविंद**–मृत्यू १९४३.
६/५ **अनंत गोविंद**–जन्म २८ ।५ ।१९४१. ठाणे. शिक्षण–नॉन मॅट्रिक. व्यवसाय–सिमेन्स इंडिया ठाणे-बेलापूर रोड येथे नोकरी. वास्तव्य–एव्हरेस्ट सोसायटी, विष्णूनगर, बिल्डिंग नं. ४, ब्लॉक नं. २, डोंबिवली (प.)
भार्या : **अंजली**–माहेर–नीला राजाराम देसाई. मणचे.
कन्या : **अनघा**–जन्म ९ ।३ ।१९८१.
७/६ **अजय अनंत** –जन्म २० ।३ ।१९७६ शिकत आहे.
८/४ **महादेव दत्तात्रय**–मृत्यू १९३३ मिरज येथे.
९/४ **वासुदेव दत्तात्रय**–जन्म ११ ।१२ ।१९०७. मृत्यू १९ ।११ ।१९७७.
भार्या : **सुमती**–माहेर–सुमती रघुनाथ गद्रे.
१०/५ **श्रीराम वासुदेव**–जन्म २० ।१२ ।१९३४. शिक्षण–एम्.बी.बी.एस्; डी.ए. व्यवसाय–(अॅनेस्थेटिस्ट) चा नोव्हेंबर १९६३ पासून खाजगी व्यवसाय. वास्तव्य–११९ हिंदू कॉलनी, ५ वी गल्ली, दादर, मुंबई–४०००१४.
भार्या : **निर्मला**–माहेर–मंदाकिनी गोविंद पेंडसे. मुंबई.
कन्या : **अश्विनी**–जन्म ५ ।२ ।१९६७. शिक्षण–बी. कॉम्. सी. ए. करीत आहे.
११/६ **अतुल श्रीराम**–जन्म ५ ।१ ।१९६४. शिक्षण–बी.ई. (इलेक्ट्रिकल), एम्.एस्. (इलेक्ट्रिकल.) करीत आहे.

## घराणे क्रमांक ८.

## केळे मजगांव–नंदुरबार–मुंबई

गेली दीडशे वर्षे नंदुरबार, जि. धुळे येथे या घराण्यातील अभ्यंकर व्यक्ति स्थायिक झाल्या आहेत. यांचे मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यातील केळे मजगांव. परंतु गेल्या ४ पिढ्या यापैकी कोणीही व्यक्ति केळे–मजगांव या आपल्या मूळ गांवी गेलेल्या नाहीत. या घराण्यातील पूर्वज केळे मजगांवहून गुजराथेत डाकोर येथील रणछोडरायाची प्रतिष्ठापना करण्यासाठी गेले होते व त्यानंतर त्यांचे बडोद्यास स्थलांतर झाले. बडोदे येथे श्रीमंत गायकवाड दरबारी पुराण सांगण्याची कामगिरी त्यांचेकडे होती. एक दोन पिढ्या बडोद्यास गेल्यानंतर या घराण्यातील केशव अनंत हा नंदुरबारला त्याच्या विनापत्य असलेल्या मावशीच्या घरी राहावयास गेला. व तेव्हा पासून हे अभ्यंकर कुटुंब नंदुरबार येथे स्थायिक झाले आहे. कृष्णाजी नारायण यांचे चार पुत्र चार वेगवेगळ्या ठिकाणी स्थायिक झाले आहेत. मात्र शंकर कृष्णाजी हे नंदुरबार येथेच स्थायिक आहेत.

**कुळधर्म–कुळाचार**–या घराण्यातील व्यक्ति श्रीराम, देवी व खंडोबा मानतात. नवरात्र असते. ललिता पंचमी, अनंताची पूजा करतात. तसेच जन्माचे व कार्याचे वेळी बोडण घालतात.

## घराणे क्रमांक ८


## वंशावळी क्रमांक १

## केळे मजगांव–नंदुरबार–मुंबई

१/१ **महादेव**– #
२/२ **हरि**– #
३/३ **बल्लाळ हरि**–हे १६०९ मध्ये हयात होते.
४/४ **अनंत बल्लाळ**–हे १७४४ मध्ये हयात होते असे ग्रामोपाध्येंच्या वहीवरून समजते. इतर माहिती नाही.
५/५ **केशव अनंत**–हे १७६० मध्ये हयात होते असे ग्रामोपाध्येंच्या उताऱ्यावरून समजते व डाकोर (गुजराथ) येथे राहात होते. इतर माहिती नाही.
६/६ **नारायण केशव**–हे १७८४ त हयात असावेत. मृत्यू १९००. व्यवसाय–वकील.
७/७ **कृष्णाजी नारायण**–जन्म १८६८. मृत्यू १७ ।१२ ।१९३३.
भार्या : **अन्नपूर्णाबाई**–मृत्यू २९ ।४ ।१९४४.
माहेर–सत्यभामाबाई दत्तात्रय [illegible]

कन्या :
१) **इंदिरा**–सासर–शारदा सहस्रबुध्दे. मृत.
२) **शारदा**–सासर–दातीर.
३) नाव माहित नाही. सासर–लेले. 'वनविहार' कॉलनी, बंगला क्र. ८. भोसला मिलिटरी स्कूलमागे, नाशिक.
४) **प्रभावती**–सासर–प्रभावती भालचंद्र केतकर. नागनाथपारा जवळ, सदाशिव पेठ, आपटे वाडा पुणे–३०
५) **भानुमती**–सासर–निर्मला अनंत जोग. 'राजश्री' अपार्ट., कमला नेहरू पार्क, पुणे ४
६) **सिंधु**–सासर–सिंधु दिनकर गोखले. ५१७, नारायण पेठ, पुणे.
७) **सुलभा**–सासर–शरयू अरविंद लिमये. ६ ।१००, पार्लेश्वर सोसा. विलेपार्ले, (पूर्व). मुंबई–५७.
८/८ **श्रीराम कृष्णाजी**–जन्म सन १९१२ चैत्र पाडवा, शिक्षण- मॅट्रिक. व्यवसाय–ब्रूक बॉंड इंडिया मधून निवृत्त. वास्तव्य–इंदिरा निवास, १२१० । ब, टिळकवाडी, सदाशिव पेठ, पुणे, ४११०३०.
भार्या : माहेर–शकुंतला परशुराम आगाशे.
कन्या : **सरोज**–जन्म २२ ।६ ।१९३४. सासर–सरोज वसंत दणगे.
९/९ **केशव श्रीराम**–जन्म २३ ।७ ।१९३६. **शिक्षण**–एम्.डी., डी.एम्.आर.ई. व्यवसाय–१९६५ ते १९७६ सेंट्रल रेल्वेत नोकरी. १ जुलै १९७६ पासून ठाणे येथे कन्सल्टिंग रेडिऑलॉजिस्ट म्हणून व्यवसाय. वास्तव्य–८ मंदार, ३०४ स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर, मुंबई ४०००२८.
भार्या : **प्रभात**–माहेर–प्रभात भालचंद्र पालकर.
१०/१० **मिलिंद केशव**–जन्म २२ ।१० ।१९६४. शिक्षण–एम्.कॉम. यु.एस्.ए. मध्ये एम्.बी.ए.करीत आहे.
११/८ **शंकर कृष्णाजी**–जन्म ३ ।७ ।१९१६. नंदुरबार येथे. शिक्षण–मॅट्रिक. नंतर बार कौन्सिलची परिक्षा. व्यवसाय–४८ वर्षे वकिली केली. वास्तव्य–कृष्णकुंज, टिळक रोड, मु. पो. नंदुरबार, जि. धुळे ४२५४१२.
**भार्या : पार्वतीबाई**–माहेर–कावेरी शंकरराव जोगळेकर. इंदूर.
कन्या :
१) **पुष्पलता**–**सासर**–पुष्पलता अनंतराव धारप. पवई.
२) **सीमा**–सासर–सीमा अनिलराव पावगी. नागपूर.
१२/९ **श्रीकांत शंकर**–जन्म १ ।१२ ।१९४६. शिक्षण–बी.ई. सिव्हिल. वास्तव्य–मुंबई.
१३/१० **सारंग श्रीकांत**– #
१४/९ **मुकुंद शंकर**–जन्म २८ ।८ ।१९४९. शिक्षण–बी. ई. मेटालर्जी. वास्तव्य–पुणे.
१५/१० **अजिंक्य मुकुंद**– #
१६/१० **आनंद मुकुंद**– #
१७/९ **जयंत शंकर**–जन्म २६ ।८ ।१९५१. शिक्षण–बी. कॉम.
कन्या : **जास्वंदी**–
पुत्र–**मानस जयंत**– #
१८/९ **अनिल शंकर**–जन्म १५ ।३ ।१९५४. शिक्षण–बी.कॉम., एल्.एल्.बी.
कन्या :
१) **स्मृती**–इतर माहिती नाही.
२) **तृप्ती**–इतर माहिती नाही.
१९/८ **गोविंद कृष्णाजी**–जन्म ३० ।८ ।१९१८. नंदुरबार येथे. शिक्षण–बी.ए. (ऑनर्स). व्यवसाय–डिफेन्स अकौंटस् मध्ये नोकरी, अकौंटस् ऑफिसर पदावरून निवृत्त. वास्तव्य–'पर्वती बहार', २, लक्ष्मीपार्क, नवीपेठ, पुणे ४११०३०.
भार्या : **लता**–माहेर–येसूमाई, बार्शी.
कन्या : **मृणालिनी**–जन्म ११ ।४ ।१९५२. शिक्षण–एम्.एस्सी. पी एच्.डी. (बॉटनी) व्यवसाय–फर्ग्युसन कॉलेजमध्ये अध्यापिका. सासर–मृणालिनी राजेंद्र बेहेरे. पुणे. पती–डॉ. राजेंद्र गणपती बेहरे - डेन्टिस्ट, पुणे.
२०/९ **विश्वास गोविंद**–जन्म ११ ।९ ।१९४६. शिक्षण–एम्.एस्; पी.एच्.डी. इंजिनिअर (अमेरिका) व्यवसाय–रॉचेस्टरला (यु.एस्.ए.) कोडॅकमध्ये नोकरी.
भार्या : **अनुराधा**–माहेर–आठवले.
२१/१० **विनय विश्वास**– इतर माहिती नाही.
२२/१० **विवेक विश्वास**– इतर माहिती नाही.
२३/८ **श्रीपाद कृष्णाजी**–जन्म २९ ।७ ।१९२२. शिक्षण–एम्.ए. व्यवसाय–अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने या राजपत्रित पदावरून १ ।८ ।१९८० रोजी निवृत्त. वास्तव्य-एल्/ ४ शारदाश्रम, भवानी शंकर रोड,


## घराणे क्रमांक ८
## वंशावळी क्रमांक १
## केळे मजगांव–नंदुरबार–मुंबई




दादर (प.) ४०००२८.
भार्या : **वसुंधरा**–माहेर–शकुंतला रामचंद्र पाटणकर.
२४/९ **सागर श्रीपाद**–जन्म १७ ।८ ।१९५१.
शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–लायका लॅब. मध्ये मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह वास्तव्य–शारदाश्रम, दादर, मुंबई–२८.
भार्या : **शुभांगी**–माहेर–सुनंदा लवाटे. ठाणे.

कन्या :
१) **रागिणी**–जन्म २७ ।५ ।१९८०.
२) **आसावरी**–जन्म २२ ।९ ।१९८६.
२५/९ **अमृत श्रीपाद**–जन्म ७ ।१० ।१९५३.
शिक्षण–बी.टेक (इलेक्ट्रिकल.), बनारस हिंदू युनिव्हर्सिटी व्यवसाय–रेकेम या अमेरिकन कंपनीमध्ये, वसई येथे नोकरी. वास्तव्य-भवानी नगर, अंधेरी (पूर्व)

## घराणे क्रमांक ८
## वंशावळ क्रमांक २
## केळे मजगांव–पुणे–मुंबई




भार्या : **रेखा** –माहेर–रेखा अनंत चितळे. डोंबिवली.
कन्या : **सृष्टी**–जन्म ८ ।९ ।१९८३.
२६/९ **कौस्तुभ श्रीपाद**–जन्म २१ ।१ ।१९६४.
शिक्षण–बी.एस्सी. (फिजिक्स)
२७/६ **सखाराम केशव**– #
२८/७ **त्रिंबक सखाराम**– #
२९/६ **रामचंद्र केशव**–मृत.
भार्या : **यमुना**–मृत. माहेर–पिंपळखरे.
३०/६ **सदाशिव केशव**–अविवाहित. मृत.


## घराणे क्रमांक ८
## वंशावळी क्रमांक २
## केळे मजगांव–पुणे–मुंबई.

३१/४ **चिमण बल्लाळ**– #
३२/४ **बचंभट (बच्चाजी) बल्लाळ**–यांनी गुरूगृही राहून २० वर्षे पर्यंत अग्नीहोत्राचे काम विनामूल्य केले.

## घराणे क्रमांक ८

## वंशावळ क्रमांक ३

## केळे मजगांव–पुणे–मुंबई




३३/५ **लक्ष्मण बचंभट–** #

३४/५ **गणेश बचंभट–** #

३५/६ **नागेश गणेश–**हे अग्निहोत्री होते व वेदविद्या शाळा चालवित असत. त्यांचेकडून वेदविद्या संपादन केलेले २५/३० विद्यार्थी पुढे प्रसिध्दीस आले. त्यापैकी एक गोविंद विश्वनाथ साठे. मु. टोळवाड, पिरंदवणे जि. रत्नागिरी हे एक होत. यांना पुत्र संतान नसल्याने दामले घराण्यातील मुलगा दत्तक घेतला.

३६/७ **दत्तात्रय नागेश–**(द.आ.) हे दामले घराण्यातून दत्तक आले. जन्म १८९१ मृत्यू १९६३.
वास्तव्य–केळे-मजगांव.
भार्या : **सरस्वती–**माहेर–नागु भार्गव लिमये.
कन्या :
१) **रमा–**सासर- रमा श्रीपाद लिमये, रा. मालगुंड.
२) **विमल–**सासर–विमल विनायक वझे, रा. कोतवडे.
३) **लिला–**सासर–लिला पुरूषोत्तम मोने, रा. कोतवडे.

३७/८ **गणेश दत्तात्रय–**जन्म भाद्रपद वद्य ११ शके १८४० म्हणजेच इ. स. १९१८ केळे येथे.
शिक्षण–मराठी ४ थी शिवाय वेदविद्या, याज्ञिकीचे शिक्षण. व्यवसाय–भिक्षुकी आणि शेती. वास्तव्य–केळे आंबेकोंडी, जिल्हा–रत्नागिरी.
भार्या : **शारदा–**माहेर–रानडे रा. भादगाव. अपत्य नाही.

३८/८ **वासुदेव दत्तात्रय–**जन्म १९४४. शिक्षण–मराठी चौथी, व्यवसाय–शेती. वास्तव्य–केळे- आंबेकोंडी, जि. रत्नागिरी.
भार्या : **वर्षा–**माहेर–सुलभा मुकुंद केळकर

रहाणार—धोकंबळे, नेवरे जवळ जि. रत्नागिरी.
कन्या : **विभावरी**—जन्म ८।७।८३. शाळेत शिकत आहे.
३९/९ **विद्याधर वासुदेव**—जन्म २५।४।१९७८ शिकत आहे.
४०/५ **विष्णू बचंभट**— #
४१/६ **हरि विष्णू**— #
४२/६ **वामन विष्णू**— #
४३/७ **कृष्ण वामन**— #
४४/७ **वासुदेव वामन**— #
४५/५ **रामचंद्र बचंभट**— #
४६/५ **रघुनाथ बचंभट**—यांना २ पुत्र व १ कन्या.
कन्या : **साळुबाई**—

## घराणे क्रमांक ८

### वंशावळी क्रमांक ३

### केळे। मजगांव – जळगांव – औरंगाबाद – नाशिक.

४७/६ **गणेश रघुनाथ**—हे मूळचे केळे-मजगावचे. पण मागाहून १८९५-९६ च्या सुमारास आपटे, ता. पनवेल जि. रायगड येथे कापडाचा व्यवसाय करू लागले. त्यांना कापडमामा म्हणून लोक ओळखत.
भार्या : नाव समजले नाही. ३ पुत्र आणि २ कन्या.
कन्या :
१) **बगुताई**—सासर—लिमये. बडोदे.
२) **गंगूबाई**—सासर—केळकर. मेहसाणा (गुजरात)
४८/७ **गोविंद गणेश**—लहानपणी प्लेगने मृत्यू १९१८.
४९/७ **अच्युत गणेश**—जन्म १८८९. पेण येथे शिकत होते. वडील वारल्यावर पेण येथून बडोदे येथे शिक्षणासाठी गेले बीं. ए. झाल्यावर मुंबईस एल एल.बी. साठी आले. आर्यन एज्यु. सोसायटी मुंबई येथील शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करत असताना एल एल.बी. पदवी प्राप्त केली. १९४६ च्या सुमारास जळगाव येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला व आपल्या भावंडांना ही बरोबर नेले. जळगाव येथे प्रथित यश वकील म्हणून ख्याती मिळवली. १९५६ मध्ये वयाच्या ६७ व्या वर्षी निवर्तले. दोन पुत्र व दोन कन्या.
कन्या :
१) **सुशिला**—जन्म १९१६. सासर—कोल्हटकर. मृत्यू १९८६.
२) **सिंधू**—जन्म १९३०. नोकरी—एल.आय.सी. त सासर—आठवले.
५०/८ **भिकाजी अच्युत**—लहानपणीच परागंदा. मृत.
५१/८ **रघुनाथ अच्युत**—मॅट्रिक. पुढील माहिती नाही.
५२/७ **नारायण गणेश**—जन्म आपटे, ता. पनवेल येथे. जन्म २९।१२।१८९६. मृत्यू २३।१२।१९८२. औरंगाबाद येथे. नोकरी—महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँकेत. एजंट इन्स्पेक्टर. त्यांच्या वारंवार बदल्या होत.
भार्या : **मथुराबाई**—जन्म १९०५. माहेर—यमूताई यशवंत सिधये. जळगाव. हयात. सध्या वास्तव्य—औरंगाबाद येथे मुलाकडे.
कन्या :
१) **मालती**—जन्म १९३२. शिक्षण—मॅट्रिक सासर—संजिवनी साने, पिंपळगाव, नाशिक, पति—वैद्यकीय व्यवसाय १९५३ पासून पिंपळगाव येथे करतात.
२) **प्रेमावती**—जन्म १९३८. सासर—सुमती निजसुरे पति- डब्ल्यू ऐ. एल. एम. आय. या संस्थेत ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर.
५३/८ **यशवंत नारायण**—जन्म १९२५. मृत्यू १९८३.
भार्या : **निर्मला**—माहेर—विमल जोगळेकर, वाई. वास्तव्य—आयडियल कॉलनी, अनामय सोसा. कोथरूड पुणे.
५४/९ **प्रमोद यशवंत**—जन्म १९५५. शिक्षण—बी. कॉम. व्यवसाय—मिलिटरीत मेजर ह्या हुद्यावर आहेत.
भार्या : **उमा**—माहेर—ठाऊक नाही. कन्या—२.
कन्या :
१) **दिप्ती**—वय ५ वर्षे.
२) **श्रध्दा**—वय २ वर्षे.
५५/८ **हरि नारायण**—जन्म ९।६।१९२८. कल्याण येथे. शिक्षण—बी. एस्सी. (ऑनर्स). एम. एस्सी. मुंबई

विद्यापीठ. व्यवसाय–सरकारी नोकरी राजपत्रित अधिकारी वर्ग १. प्राध्यापक- जीवन रसायन शास्त्र. वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद. १९८६ मध्ये निवृत्त वास्तव्य–११, दशमेश नगर, नविन उस्मानपुरा, औरंगाबाद.
भार्या : **विजया**–माहेर–कुमुद सखाराम दामले. यवतमाळ. कन्या १ पुत्र १.
कन्या : **संध्या-जन्म** २४ ।११ ।१९५५. शिक्षण–एम. डी. (मेडिसिन). सासर–डॉ. संध्या रघुनंदन भिडे औरंगाबाद. व्यवसाय–औरंगाबाद महानगरपालिकेत मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरी. वास्तव्य–दशमेश नगर, नविन उस्मानपुरा. औरंगाबाद.
५६/९ **अमित हरि**–जन्म १६ ।३ ।१९६०. शिक्षण–एम. कॉम. व्यवसाय–औरंगाबाद येथील औषधाच्या कंपनीत अकौटंट म्हणून नोकरी.
भार्या : **संगीता**–माहेर–संगीता कृष्णराव तळेकर. पुणे.
पुत्र–**अनिष**–जन्म २३ ।४ ।१९८८.
५७/८ **श्रीकांत नारायण**–जन्म ३ ।७ ।१९४२. शिक्षण–बी. कॉम. ए.अफ. आय.आय.व्यवसाय–एल. आय.सी. मध्ये नोकरी. वास्तव्य–प्लॉट नं ३० अनुश्री बंगला. जिवनस्वप्न हौ. सोसायटी. इंदिरानगर, नाशिक.
भार्या : **अनुराधा**–शिक्षण–आर्ट मास्टर.
माहेर–अनुराधा प्रभाकर सहस्त्रबुध्दे, शिवाजीनगर, नौपाडा, ठाणे. व्यवसाय–नाशिक येथे शिक्षिकेची नोकरी.
५८/९ **शैलेश श्रीकांत**–जन्म ५ ।११ ।१९६८. शिक्षण–बी. ई. तिसरे वर्ष.
५९/६ **हरि रघुनाथ**– #
६०/४ **गंगाधर बल्लाळ**– #
६१/५ **विष्णू गंगाधर**– #